Date: 30th September 2026

To,
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort, Mumbai – 400 001
**BSE Scrip Code: 544179**

To,
**National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza, C-1, Block G Bandra Kurla
Complex, Bandra (East), Mumbai – 400 051
**NSE Symbol: GODIGIT**

**Subject:** **Newspaper advertisement of notice convening meeting of the Equity Shareholders of Go Digit General Insurance Limited ("Company") for approving Scheme of Amalgamation amongst Go Digit Infoworks Services Private Limited ("Transferor Company") and Go Digit General Insurance Limited ("Transferee Company") and their respective shareholders under Sections 230 to 232 and other applicable provisions of the Companies Act, 2013, read with Section 35 and other applicable provisions of the Insurance Act, 1938 and the rules and regulations framed thereunder ("Scheme")**

Dear Sir/Madam,

This is in continuation to our earlier intimation dated 29th September 2026, whereby we had enclosed copies of newspaper advertisement published in Business Standard (Maharashtra edition) in English language and in Loksatta (Maharashtra edition - Except Chhatrapati Sambhajinagar Edition) in vernacular language, regarding the dispatch of the Notice convening Meeting of the Equity Shareholders for approval of the Scheme and the e-voting information thereto pursuant to the Order dated 13th August 2026 passed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench **("NCLT")**, and in compliance with the Regulation 44 of the SEBI Listing Regulations, Section 108 of the Companies Act, 2013 read with Rule 20 of the Companies (Management and Administration Rules), 2014, as amended.

In furtherance to the same, we hereby enclose copy of the newspaper advertisement published in Loksatta (Maharashtra edition - Chhatrapati Sambhajinagar Edition) in vernacular language on Wednesday, 30th September 2026.

The newspaper advertisement shall be made available on the website of the Company at https://www.godigit.com/investor-relations.

We request you to kindly take the above intimation on record.

Thanking you,

Yours sincerely,
**For Go Digit General Insurance Limited**

TEJAS SARAF
Digitally signed by TEJAS SARAF
Date: 2026.09.30 18:57:42 +05'30'

**Tejas Saraf**
**Company Secretary & Compliance Officer**

**Encl: as above.**

**फॉर्म क्र. सीएए. २**

**[कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३०(३) तसेच कंपनी (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि ७ अन्वये]**

**राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठसमोर**

**कंपनी अर्ज क्र. १२५ (एमबी) सन २०२६**

कंपनी अधिनियम, २०१३ च्या बाबतीत

आणि

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते कलम २३२ तसेच त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांतील इतर लागू तरतुदींच्या बाबतीत

आणि

गो डिजिट इन्फोवर्क्स सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आणि गो डिजिट जनरल इन्शुरन्स लिमिटेड तसेच त्यांच्या संबंधित भागधारकांमधील विलीनीकरण योजनेच्या बाबतीत

| | | |
|---|---|---|
| गो डिजिट जनरल इन्शुरन्स लिमिटेड | ) | द्वितीय अर्जदार कंपनी |
| CIN: L66010PN2016PLC167410 | ) | हस्तांतरिती कंपनी (ट्रान्सफरी कंपनी) |
| १स्ट ते ६थ फ्लोअर्स, अनंता वन, प्राईड हॉटेल | ) | कंपनी |
| लेन, नरवीर तानाजी वाडी, सिटी सर्व्हे क्र. १५७९ | ) | |
| शिवाजी नगर, पुणे, महाराष्ट्र, भारत – ४११००५ | ) | |

**गो डिजिट जनरल इन्शुरन्स लिमिटेडच्या इक्विटी भागधारकांच्या सभेची सूचना आणि जाहिरात**

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (**"माननीय न्यायाधिकरण" किंवा "एनसीएलटी"**) यांनी कंपनी योजना अर्ज क्र. C.A.A. (सीएए)/१२५ (एमबी)२०२६ मधील दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे (**"एनसीएलटी आदेश"**), गो डिजिट जनरल इन्शुरन्स लिमिटेड (**"द्वितीय अर्जदार कंपनी" किंवा "हस्तांतरिती कंपनी (ट्रान्सफरी कंपनी)" किंवा "कंपनी"**) यांच्या इक्विटी भागधारकांची सभा बोलविण्याचे निर्देश दिले आहेत. या सभेचा उद्देश गो डिजिट इन्फोवर्क्स सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ("प्रथम अर्जदार कंपनी" किंवा "हस्तांतरक कंपनी" (ट्रान्सफरर कंपनी) आणि गो डिजिट जनरल इन्शुरन्स लिमिटेड ("द्वितीय अर्जदार कंपनी" किंवा "हस्तांतरिती कंपनी" (ट्रान्सफरी कंपनी) तसेच त्यांच्या संबंधित भागधारकांमध्ये कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") च्या कलम २३० ते २३२ व इतर लागू तरतुदी तसेच विमा अधिनियम, १९३८ च्या कलम ३५ व इतर लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले नियम व विनियम यांच्या अनुषंगाने प्रस्तावित सुधारित विलीनीकरण योजना (**"योजना"**) यावर विचार करणे आणि आवश्यक वाटल्यास, बदलांसह किंवा बदलांशिवाय, ती मंजूर करणे हा आहे. ही योजना, कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ ("अधिनियम") तसेच कंपनी (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरणे) नियम, २०१६ ("सीएए नियम") आणि त्याअंतर्गत लागू असलेल्या इतर तरतुदी व नियम (वेळोवेळी लागू असलेल्या कोणत्याही वैधानिक दुरुस्ती, बदल किंवा पुनर्प्रवर्तनासह), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली लागू सामान्य परिपत्रके ("एमसीए परिपत्रके"), भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सूचीबद्धता बंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ ("सेबी सूचीबद्धता विनियम"), सेबी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/पीओडी-२/पी/सीआयआर/२०२३/९३ दिनांक २० जून २०२३ ("सेबी योजना परिपत्रक") (वेळोवेळी सुधारित), तसेच सेबी कडून जारी इतर लागू परिपत्रके आणि भारतीय कंपनी सचिव संस्थेने जारी केलेले सर्वसाधारण सभांसंबंधीचे सचिवीय मानक ("एसएस-२") यांच्या अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आली आहे. ही योजना इक्विटी भागधारकांनी मंजूर केल्यास, त्यानंतर ती माननीय न्यायाधिकरणाच्या मंजुरीस तसेच आवश्यकतेनुसार इतर नियामक किंवा संबंधित प्राधिकरणांच्या मंजुरी, परवानग्या आणि मान्यतांच्या अधीन राहील.

भारतीय विमा विनियामक आणि विकास प्राधिकरणाने (IRDAI) नोंदविलेल्या निरीक्षणानुसार, विमा अधिनियम, १९३८ च्या कलम ३५ तसेच त्याअंतर्गत लागू असलेल्या इतर तरतुदी, नियम व विनियम यांची लागूता स्पष्टपणे दर्शविण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. योजनेच्या इतर सर्व अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसून त्या पूर्ववत लागू राहतील व पूर्ण प्रभावाने अंमलात राहतील.

उक्त एनसीएलटी आदेशाच्या अनुषंगाने आणि त्यामधील निर्देशांनुसार, यापुढे अशीही सूचना देण्यात येते की, इक्विटी भागधारकांची सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (**"व्हीसी"**) आणि/किंवा इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (**"ओएव्हीएम"**) आयोजित करण्यात येणार आहे. ही सभा कंपनी अधिनियम, २०१३ मधील संबंधित तरतुदी, त्यासोबत वाचावयाचा कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० व इतर लागू तरतुदी, कंपनी (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरणे) नियम, २०१६ ("सीएए नियम") , भागधारकांच्या सभा व्हीसी / ओएव्हीएम द्वारे घेण्यासाठी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने वेळोवेळी जारी केलेली परिपत्रके, सेबी सूचीबद्धता विनियमांतील विनियम ४४ व इतर लागू विनियम, सेबी योजना परिपत्रक तसेच एसएस-२ यांच्या अनुरूप आयोजित करण्यात येईल. त्यामुळे इक्विटी भागधारकांना कोणत्याही समान स्थळी प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता असणार नाही.

सदर सभेचे वेळापत्रक खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल:

| सभेचा वर्ग | सभेचा वार व दिनांक | सभेची वेळ (IST) | रिमोट ई-व्होटिंग सुरू व समाप्तीची वेळ |
|---|---|---|---|
| इक्विटी भागधारक | गुरुवार, ५ नोव्हेंबर २०२६ | सकाळी ११:०० वाजता | सुरुवातीची वेळ: रविवार, १ नोव्हेंबर २०२६ सकाळी ९:०० वाजल्यापासून (भाप्रवे)<br>समाप्तीची वेळ: बुधवार, ४ नोव्हेंबर २०२६ संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत (भाप्रवे) |

इक्विटी भागधारकांच्या सभेमध्ये मतदानाची प्रक्रिया सभेदरम्यान (व्हीसी/ओएव्हीएम द्वारे आयोजित) उपलब्ध करून दिलेल्या ई-व्होटिंग सुविधेद्वारे पार पडेल. याशिवाय, इक्विटी भागधारकांच्या सभेपूर्वी रिमोट ई-व्होटिंगची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उक्त सभेची सूचना, स्पष्टीकरणात्मक निवेदन (एक्स्प्लेनेटरी स्टेटमेंट) आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० आणि २३२ सह कलम १०२ व इतर लागू तरतुदी तसेच सीएए नियमांनुसार आवश्यक असलेली इतर संलग्न कागदपत्रे (एकत्रितपणे "सूचना") द्वितीय अर्जदार कंपनीने सभेस उपस्थित राहण्यास व मतदान करण्यास पात्र व्यक्तींना पाठविली आहेत. इक्विटी भागधारकांच्या बाबतीत, द्वितीय अर्जदार कंपनीकडे किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंद असलेल्या त्यांच्या शेवटच्या ई-मेल पत्त्यावर ही सूचना ई-मेलद्वारे पाठविण्यात आली आहे. ज्या इक्विटी भागधारकांचे ई-मेल पत्ते द्वितीय अर्जदार कंपनीकडे किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांनी या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सूचनांचे पालन करावे.

योजनेच्या प्रती, सभा सूचना आणि त्या सोबतची कागदपत्रे, ज्यामध्ये कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०२ सह कलम २३० ते २३२ अन्वये आवश्यक स्पष्टीकरणात्मक निवेदनाचाही समावेश आहे, या द्वितीय अर्जदार कंपनीच्या वेबसाईटवर www.godigit.com, तसेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. तसेच, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) (ई-व्होटिंग सुविधा प्रदाता) यांच्या https://www.evoting.nsdl.com या वेबसाईटवरूनही हे दस्तऐवज डाउनलोड करता येतील.

सदर सभेची सूचना स्पष्टीकरणात्मक निवेदन तसेच कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० आणि २३२ सह कलम १०२ व इतर लागू तरतुदी तसेच सीएए नियमांनुसार आवश्यक असलेली इतर संलग्न कागदपत्रे यांची प्रत विनामूल्य उपलब्ध करून दिली जाईल. यासाठी लेखी विनंती द्वितीय अर्जदार कंपनीकडे cs@godigit.com या ई-मेल पत्त्यावर पाठविता येईल. तसेच, या कागदपत्रांच्या प्रती द्वितीय अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात, म्हणजे पहिला ते सहावा मजला, अनंता वन, प्राईड हॉटेल लेन, नरवीर तानाजी वाडी, सिटी सर्व्हे क्रमांक १५७९, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र, भारत - ४११००५, येथे सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेतही उपलब्ध करून दिल्या जातील.

तसेच, सदर सभा व्हीसी/ओएव्हीएम द्वारे आयोजित करण्यात येत असल्याने, वरील MCA परिपत्रकांनुसार आणि माननीय एनसीएलटी च्या आदेशानुसार, सभेला उपस्थित राहण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी प्रॉक्सी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध असणार नाही. तथापि, अधिनियमाच्या कलम ११२ आणि ११३ तसेच वरील MCA परिपत्रकांनुसार, कॉर्पोरेट भागधारकांना त्यांच्या वतीने सभेत व्हीसी/ओएव्हीएम द्वारे उपस्थित राहण्यासाठी, चर्चेत सहभागी होण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी अधिकृत प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार असेल. यासंबंधी अधिक माहितीसाठी कॉर्पोरेट भागधारकांनी सभेच्या सूचनेचा संदर्भ घ्यावा.

व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सभेस उपस्थित राहणारे इक्विटी भागधारक, अधिनियमाच्या कलम १०३ आणि एनसीएलटी च्या आदेशातील अटींनुसार, गणपूर्ती निश्चित करण्याच्या उद्देशाने उपस्थित मानले जातील. याशिवाय, एनसीएलटी च्या आदेशानुसार, सभेच्या प्रारंभी आवश्यक कोरम उपस्थित नसल्यास, सभा ३० (तीस) मिनिटांसाठी स्थगित करण्यात येईल आणि त्यानंतर उपस्थित असलेल्या व्यक्तींमुळे सभेची गणपूर्ती पूर्ण झाल्याचे मानले जाईल

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने (एनसीएलटी) श्री कुलदीप कुमार करीर, माजी सदस्य (न्यायिक), यांची आणि ते उपलब्ध नसल्यास श्री महेंदर कुमार गर्ग (डीआयएन: ०००८१४५४), द्वितीय अर्जदार कंपनीचे स्वतंत्र संचालक, यांची इक्विटी भागधारकांच्या सभेचे अध्यक्ष (चेअरपर्सन) म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच, एनसीएलटी ने श्री सुनील जी. नानल (सभासद क्रमांक एफसीएस-५९७७ आणि सीपी क्र. २८०९), भागीदार, कंज अँड कंपनी एलएलपी, यांची आणि ते उपलब्ध नसल्यास वैष्णवी पावसे (सभासद क्रमांक एसीएस-५२३८० आणि सीपी क्र. १९२६५), भागीदार, कंज अँड कंपनी एलएलपी, प्रॅक्टिसिंग कंपनी सचिव (प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी), यांची सभेसाठी परिनिरीक्षक (स्क्रुटिनायझर) म्हणून नियुक्ती केली आहे.

वरील योजना, सभेमध्ये मंजूर झाल्यास, त्यानंतर माननीय न्यायाधिकरणाच्या मंजुरीस तसेच आवश्यकतेनुसार इतर नियामक किंवा संबंधित प्राधिकरणांच्या मंजुरी, परवानग्या आणि मान्यतांच्या अधीन राहील.

बुधवार, ४ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंतच रिमोट ई-व्होटिंगची सुविधा उपलब्ध असेल. त्यानंतर रिमोट ई-व्होटिंगची अनुमती दिली जाणार नाही आणि संबंधित कालावधी संपताच एनएसडीएलद्वारे रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल तात्काळ निष्क्रिय करण्यात येईल.सभेस उपस्थित राहणाऱ्या ज्या इक्विटी भागधारकांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले नसेल, त्यांना सभेदरम्यान सूचनेमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करता येईल. ज्या इक्विटी भागधारकांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आधीच मतदान केले आहे, ते सभेस उपस्थित राहू शकतात; तथापि, त्यांना सभेत पुन्हा मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

कट-ऑफ तारखेस कंपनीच्या सदस्य नोंदवहीत (रजिस्टर ऑफ मेम्बर्स) किंवा डिपॉझिटरीजद्वारे राखल्या जाणाऱ्या लाभधारक मालकांच्या नोंदवहीत (रजिस्टर ऑफ बेनिफिशियल ओनर्स) ज्यांचे नाव नोंदलेले आहे, अशाच इक्विटी भागधारकांना सूचनेमध्ये प्रस्तावित ठरावावर मतदानाचा अधिकार वापरणे आणि सभेस उपस्थित राहणे मान्य असेल. इक्विटी भागधारक अथवा लाभधारक मालकाचे मतदानाचे अधिकार, कट-ऑफ तारखेस (गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२६) द्वितीय अर्जदार कंपनीच्या अदा झालेल्या (पेड-अप) इक्विटी भागभांडवलातील त्यांच्या भागधारणेच्या प्रमाणात असतील. जो व्यक्ती कट-ऑफ तारखेस इक्विटी भागधारक नसेल, त्याने ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने असल्याचे समजावे.

डिमॅट स्वरूपात, भौतिक स्वरूपात भागधारणा असलेल्या तसेच ज्यांनी आपला ई-मेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही अशा इक्विटी भागधारकांसाठी मतदानाची पद्धत (रिमोट ई-व्होटिंग आणि सभेदरम्यान ई-व्होटिंग दोन्ही) यासंबंधीची माहिती व सूचना सभेच्या सूचनेत दिलेल्या आहेत. तसेच, सभेची सूचना पाठविल्यानंतर द्वितीय अर्जदार कंपनीचे भागधारक बनलेल्या आणि कट-ऑफ तारखेस कंपनीच्या नोंदींमध्ये ज्यांची नावे नोंदलेली आहेत अशा व्यक्तींनी ई-व्होटिंगद्वारे मतदान कशा प्रकारे करावे, याची माहितीही सभेच्या सूचनेत उपलब्ध आहे. इक्विटी भागधारकांना सभा सूचना द्वितीय अर्जदार कंपनीच्या https://www.godigit.com/investor-relations या वेबसाईटवर पाहता येईल.

द्वितीय अर्जदार कंपनीने एनएसडीएल यांची रिमोट ई-व्होटिंग, सभेदरम्यान ई-व्होटिंग आणि व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सभेत सहभागी होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियुक्ती केली आहे. सभेपूर्वी किंवा सभेदरम्यान मदतीची आवश्यकता असलेल्या इक्विटी भागधारकांनी evoting@nsdl.com या ई-मेल पत्त्यावर किंवा ०२२-४८८६ ७००० या दूरध्वनी क्रमांकावर एनएसडीएल शी संपर्क साधावा.

सेबी सूचीबद्धता विनियमांच्या विनियम ४४ नुसार, इक्विटी भागधारकांच्या सभेतील मतदानाचा निकाल, परिनिरीक्षकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, सभेचे अध्यक्ष किंवा अध्यक्षांनी लेखी स्वरूपात अधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे, सभेच्या समाप्तीपासून दोन (२) कामकाजाच्या दिवसांच्या आत जाहीर केला जाईल. हा निकाल द्वितीय अर्जदार कंपनीच्या www.godigit.com या वेबसाईटवर, तिच्या नोंदणीकृत कार्यालयात, तसेच बीएसई लिमिटेड (www.bseindia.com), नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) आणि एनएसडीएल (https://www.evoting.nsdl.com) यांच्या वेबसाईटवर प्रदर्शित करण्यात येईल.

गो डिजिट जनरल इन्शुरन्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
श्री कुलदीप कुमार करीर
इक्विटी भागधारकांच्या सभेसाठी नियुक्त अध्यक्ष

दिनांक: २८ सप्टेंबर २०२६
स्थळ: मोहाली, चंदीगड